# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री उन्नती विषयक कार्य व विचार

**दिपाली विजय पाटील** सहायक प्राध्यापक, कमला कॉलेज कोल्हापूर.

---

- **प्रस्तावना**

अनेक वर्षापासून चालत आलेली भारतीय समाज व्यवस्था ही रूढी-परंपरा, जातीभेद, लिंगभेद याने ग्रासली होती. त्या काळात समाजव्यवस्थेत अतिशय महत्त्वाचा घटक असणाऱ्या स्त्रियांची परिस्थिती अतिशय दयनीय होती. मुलींचा जन्म दुःखद बाब समजली जायची. स्त्री ही सर्व अधिकार, स्वातंत्र्य, मानसन्मान यापासून वंचित होती. समाजात दिली जाणारी स्त्रियांना वागणूक त्यांची होणारी हेळसांड, त्यांना दिला जाणारा दुय्यम दर्जा त्यांच्यावर होणारे अन्याय हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मान्य नव्हते. समाजातील प्रत्येक स्त्री हक्कांपासून, अधिकारापासून, शिक्षणापासून वंचित होती. अशावेळी समाज व्यवस्थेला विरोध करून समाजाला समानतेचे रूप देण्याचा प्रयत्न बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. स्त्री विरोधी परंपरांना छेद देऊन अन्याय विरुद्ध कार्य करणाऱ्या आंबेडकरांना युगपुरुष, प्रतिभावंत नेते, कायदे पंडित, समाज सुधारक, स्त्रीवादी नेते अशा अनेक नावाने संबोधले जाते.

डॉ. आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य जनकल्याणासाठी अर्पण केले. त्यांनी स्त्रियांना सर्वोच्च उपयोगी व महत्त्वाचे मानले. सात मौल्यवान रत्नांपैकी स्त्री हे एक रत्न आहे, असे त्यांचे मत होते. त्यांनी शोषित स्त्रियांबरोबरच भारतातील बहुजन स्त्रियांविषयी आपली भूमिका स्पष्ट केली. स्त्री ही समाजातील सन्माननीय व्यक्ती आहे. तिला इतर सर्वांप्रमाणे मूल्यही आहेत. संविधानांने जे अधिकार हक्क सर्वांना दिले आहेत ते स्त्रियांनाही दिले आहेत, असे डॉ. आंबेडकरांचे विचार होते. डॉ. आंबेडकरांनी स्त्रीला सर्वोच्च उपयोगी व महत्त्वाचे मानून प्रचंड प्रमाणात त्यांच्याविषयी अभ्यास व चिंतन केले आणि त्यांनी भाषण, लेखन, कायदे, चळवळी याद्वारे स्त्री शिक्षणाचे, स्त्री सामाजिकरणाचे, स्त्री सक्षमीकरणाचे एकूणच स्त्री उन्नतीचे कार्य केले.

- **शोध निबंधाची उद्दिष्टे**

सदर शोध निबंधाकरिता पुढील प्रमाणे उद्दिष्टे निश्चित केली आहेत-

1. डॉ. आंबेडकर यांचे स्त्री उन्नती विषयक विचार व कार्य अभ्यासणे. .
2. डॉ. आंबेडकर यांचे स्त्री सामाजीकरणाविषयक विचार व कार्य जाणून घेणे.
3. डॉ. आंबेडकर यांचे स्त्री शिक्षणाविषयक कार्य व विचार जाणून घेणे.
4. डॉ. आंबेडकर यांचे स्त्री सक्षमीकरणासाठी केलेले कार्य जाणून घेणे.
5. हिंदू कोड बिल अभ्यासणे.
6. डॉ. आंबेडकर यांचे स्त्री उन्नतीविषयक कायदे यांची माहिती मिळविणे.

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री सामाजिकरणाविषयक विचार व कार्य**

डॉ. आंबेडकर यांनी स्त्री-पुरुष समानतेला अधिक महत्त्व दिले. स्त्रियांची प्रगती म्हणजे समाजाची प्रगती असे त्यांचे मत होते. कारण कोणत्याही समाजाचे मूल्यमापन करताना त्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे यावरून होते असे त्यांचे मत होते. समाजाचा विकास साधायचा असेल तर समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याची त्यांची आग्रही भूमिका होती. डॉ. आंबेडकर यांच्या मते समग्र प्रगती केवळ पुरुषांची नाही तर स्त्रियांची होणे आवश्यक आहे. स्त्री विषयक सामाजिक भूमिका मांडताना बाबासाहेब यांच्या मते आपल्या पतीचा, मुलाबाळाचा, कुटुंबाचा व कुळाचा नावलौकिक स्त्रियांच्या शिलावर अवलंबून आहे. स्त्रीने पतीची मैत्रीन बनून त्याच्या कार्यात सहकार्य द्यावे. मात्र पतीने गुलामासारखे वागवल्यास खंबीरपणे नकार द्यावा. तिने समतेसाठी आग्रह धरावा. आंबेडकर यांचा स्त्रियांच्या संघटनेवर फार मोठा विश्वास होता. त्याकरता स्त्रियांना विश्वासात घेऊन समाजाची सुधारणा करता येऊ शकते असे त्यांचा ठाम विचार होता. समाजातील दोष दूर करण्यासाठी पुरुषाबरोबर स्त्रियांनाही प्रत्येक कार्यात सहभागी करून घेतले पाहिजे. स्त्रियांच्या प्रगतीवर अधिक भर दिला पाहिजे असे त्यांनी विचार सातत्याने मांडल्याचे आढळून येते. स्त्री-पुरुष विषमता दूर होण्यासाठी आंबेडकरांनी पुरुषांबरोबर स्त्रियांनाही प्रत्येक आंदोलने, सभा, परिषदा, कार्यक्रम यात सहभागी करून घेतले. त्यांचा स्त्रियांच्या प्रगतीवर अधिक भर दिला .

भारतीय समाज व्यवस्थेत घट्ट रुजलेली विषमता नष्ट करण्यासाठी झटणाऱ्या बाबासाहेबांना स्त्रियांवर होणारे अन्याय-अत्याचार अस्वस्थ करत होते. पितृसत्ताक संस्कृतीचा पगडा ही लक्षात येत होता. मनाविरुद्ध झालेले विवाह आणि लादली जाणारी बाळंतपणे यांचा होणारा प्रभाव आंबेडकरांना दिसत होता. या समाज व्यवस्थेत बदल होण्यासाठी त्यांनी अनेक लेखातून, व्याख्यानातून समाजाला प्रबोधन केले आणि स्त्रियांना समाजात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री शिक्षणाविषयी कार्य व विचार**

परंपरागत समाज व्यवस्थेने स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवले होते. स्त्रियांनी शिक्षण घेणे हे चुकीची गोष्ट मानली जात होती. अशावेळी डॉ. आंबेडकर यांनी स्त्रियांच्या शिक्षण विषयक विचारांना चालना देऊन भारतीय स्त्रियांना शैक्षणिक प्रवाहात आणण्याचे महान कार्य केले. सर्वांगीण विकासाचा विचार करताना स्त्रियांचे विकास प्रक्रियेतील स्थान त्यांना तितकेच महत्त्वाचे वाटत होते. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने स्त्री शिक्षणाला त्यांनी महत्त्व दिले. जर स्त्रियांच्यामध्ये शिक्षणाची जागृती झाली तर त्या

फार मोठ्या प्रमाणात प्रगती घडवून आणू शकतात, असे त्यांचे विचार होते. डॉ. आंबेडकर यांच्या मते स्त्री शिकली तर स्वावलंबी होईल, तिला आपले अधिकार मिळतील, त्यामुळे कुटुंबाबरोबर समाजाचीही प्रगती होईल. शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना बाबासाहेब पुढे म्हणतात, एक पुरुष शिकला तर एक व्यक्ती सुधारते पण एक स्त्री शिक्षित झाली तर संपूर्ण कुटुंब शिक्षित होईल. तीने स्वतःही शिकले पाहिजे आणि मुलांनाही शिकवले पाहिजे जेणेकरून तिच्या भविष्याला योग्य आकार व दिशा मिळेल. यासाठी डॉ. आंबेडकरांनी व्यवहार उपयोगी शिक्षणाकडे अधिक भर दिला होता.

स्त्रियांना त्यांच्या अधिकाराची जाणीव होईल या विचारांचा वसा बाळगत त्यांनी ज्या अखिल भारतीय महिला परिषदा आयोजित केल्या त्यात जे ठराव मांडले त्यात स्त्री शिक्षणावर भर दिला होता. त्यांनी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून त्यात त्यांनी मुलींना प्रवेश दिला. या महाविद्यालयात मुलींना येता यावे म्हणून महाविद्यालय ते शहर अशी बस सेवा उपलब्ध करून दिली. डॉ. आंबेडकर औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयाच्या कोनशिला समारंभात शिक्षणासंदर्भात आपले धोरण स्पष्ट करताना म्हणतात, शिक्षण हे सामाजिक उन्नतीचे साधन असून शिक्षण ही सामाजिक दुखण्यावर औषध होय. डॉ. आंबेडकरांना स्त्रियांना पूर्व प्राथमिक अवस्थेत शिक्षण मिळाले पाहिजे असे वाटत होते. म्हणून डॉ. आंबेडकर यांना भारतात सक्तीचे शिक्षण अनिवार्य वाटत होते .आणि त्यासाठी त्यांनी प्रयत्नही केले. महिलांच्या शिक्षणासाठी डॉ आंबेडकरांनी सर्वोतोपरी प्रयन्त केले.

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री सक्षमीकरणाचे कार्य व विचार -**

विसाव्या शतकातील सामाजिक परिवर्तनाच्या क्रांतीचे मुख्य प्रणेते असलेले डॉ. आंबेडकर यांनी महिला सक्षमीकरणासाठीही तितकेच महत्त्वपूर्ण असे योगदान दिले आहे. शोषित, पीडित, वंचित महिलांच्या उत्कर्षासाठी त्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले. त्यांनी सर्वधर्मीय महिलांचे कल्याण आणि उन्नतीचा ध्यास घेतला होता. स्त्रियांना समान हक्क नाकारणाऱ्या रूढी, प्रथा, परंपरा यांचा विरोध केला. स्त्रियांमध्ये जनजागृती व्हावी आणि त्यांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी विविध परिषदा भरवल्या, आंदोलने केली. आवश्यक त्या ठिकाणी कायद्याचा आधारही घेतला. देवदासी, मुरळ्या, जोगतीनीसारख्या महिलांच्या माथी लादलेल्या प्रथा मुळापासून उखडून फेकण्याचे वेळोवेळी आवाहन केली.

डॉ. आंबेडकर यांनी स्त्रियांच्या सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्यांची अमलबजावणी केली. खाण कामगार स्त्रीला प्रसुती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्री कामगाराला पुरुषा इतकीच मजुरी, बहुपत्नीत्व प्रथेला पायबंदी, मजूर व कष्टकरी स्त्रियांसाठी २१ दिवसाची किरकोळ रजा व एक महिना हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि वीस वर्षाची सेवा झाल्यावर निवृत्ती वेतनाची तरतूद, यासारख्या महत्त्वाचे निर्णय डॉ. आंबेडकर यांनी घेतले. त्याचबरोबर नोकरी करणाऱ्या गर्भवती महिलांना प्रसूती रजा मिळते, त्याची सुरुवात बाबासाहेबांनी केली. १० नोव्हेंबर १९३८ रोजी बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई विधानसभेत महिलांच्या प्रश्नसंबंधीचे प्रश्न जोरदारपणे मांडले यावेळी त्यांनी बाळंतपणाच्या काळात महिलांच्या आरोग्य संबंधीच्या प्रश्नावर आपली मते व्यक्त केले. पहिले मातृत्व लाभ विधेयक १९४२ मध्ये डॉ. आंबेडकरांनी आणले होते. यानंतर १९४८ च्या कर्मचारी राज्य विमा कायद्याद्वारे महिलांसाठी प्रसूती रजेचीही व्यवस्था केली. त्यांनी राजकारण आणि संविधानाच्या माध्यमातून भारतीय समाजातील स्त्री पुरुष असामानतेची खोल दरी भरून काढण्याचा अर्थपूर्ण प्रयत्नही केला.

भारतीय संविधानात प्रामुख्याने कायद्यापुढे समानता धर्म व वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थळ या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई, सार्वजनिक सेवा योजनेच्या बाबींमध्ये समान संधी, भाषण स्वातंत्र व इतर अधिकारांचे संरक्षण, राज्याने अनुसरावयाच्या धोरणांची तत्वे, समान न्याय व विधी विषयक मोफत सहाय्य, न्याय परिस्थिती आणि प्रसूती सहाय्य तरतूद इत्यादी तरतूद करून स्त्रियांना कायदेशीर सुरक्षा कवच प्रदान केले. डॉ. आंबेडकर यांनी महिला आरोग्याचा विचार करून कुटुंब नियोजनाचा आग्रह धरला. त्यांनी छोट्या कुटुंबाची संकल्पना मांडली. त्यांनी स्त्रियांना सक्षम करणे हे पूरक ध्येय ठेवून एक योजना आखली, त्यांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले त्यातून लोक जागृती करून महिला वर्गामध्ये जनजागृती आणण्याचा प्रयत्न केला. डॉ. आंबेडकर यांनी स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी, त्यांना समाजात सन्मान व प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी अतिशय मोलाचे कार्य केले आहे.

- **महिला मुक्तीसाठी हिंदू कोड बिल**

डॉ. आंबेडकर स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. त्यांनी भारतीय स्त्रियांसाठी खूप मोठे कार्य करून ठेवले आहे. भारतीय परंपरेने स्त्रियांना नेहमीच बंधनात ठेवले अशावेळी स्त्रियांचा समग्र विकासाचा जाहीरनामा डॉ. आंबेडकर यांनी हिंदू कोड बिलातून सादर केला. १९४७ पासून सतत ४ वर्ष १ महिना २६ दिवस बाबासाहेब यांनी अविरत कष्ट करून हिंदू कोड बिल तयार केले आणि २४ फेब्रुवारी १९४९ रोजी संसदेत मांडले. स्त्रियांना कायद्याने हक्क दर्जा आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे स्वप्न त्यांनी हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून पाहिले. मनूच्या कायद्याला आव्हान देण्यासाठी आणि स्त्रियांना संपत्तीचे मूलभूत अधिकार देण्यासाठी डॉ. आंबेडकर यांनी हिंदू कोड बिल तयार केले. हिंदू कोड बिल हे स्त्रियांच्या मुक्तीसाठी शक्यता असलेला विचार पुढे आणते. महिला या हिंदू कोड बिलाच्या केंद्रबिंदू आहेत आणि मालमत्ता, विवाह आणि घटस्फोट या कायद्याद्वारे त्यांनी स्त्रियांचे सामर्थ्य वाढविण्याचे प्रयत्न केला. हिंदू कोड बिल हे सात वेगवेगळ्या घटकांशी निगडित कायद्याचे कलमात रूपांतर करणारे होते.

1. जी व्यक्ती मृत्युपत्र न करता मृत्यू पावले असेल अशा मृत्यू हिंदू व्यक्तीच्या (स्त्री आणि पुरुष दोघांच्याही मालमत्तेचा हक्काबाबत) मृताचा वारसदार ठेवण्याचा अधिकार
2. पोटगी

3. विवाह
4. घटस्फोट
5. दत्तक विधान आणि
6. अज्ञानत्व व पालकत्व इत्यादी बाबींचा या कोड बिलामध्ये समावेश होता.

भारतीय संविधान परिषदेने जात-धर्म, लिंगभेद करून मानव प्राण्यात कायदा भेदभाव करणार नाही अशी घोषणा करून स्वतंत्र, समता या तत्त्वांचा अंगीकार केला होता. पण या पार्श्वभूमीवर हिंदू स्त्रियांना त्यांचे न्याय हक्क देण्यास विरोध झाला. या बिलातील घटस्फोट, द्विभार्या या कलमांना सनातनी मनोवृत्तीच्या विरोधकांनी प्रचंड विरोध केला. त्याचप्रमाणे स्त्रियांना संपत्तीमध्ये समान वाटा, कायदेशीर बाबींनी समान संधीची तरतूद, एक विवाह पद्धतीला कायदेशीररित्या तरतूद यालाही विरोध केला. हिंदू कोड बिल संमत व्हावे म्हणून बाबासाहेब एकटेच योद्धयासारखे लढले. पण दुर्दैवाने सत्र संपताना या बिलाची चार कलमेच मंजूर झाली. यास्तव अत्यंत दुःखी कष्टी होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि २७ सप्टेंबर १९५१ रोजी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. पण बाबासाहेबांचे कष्ट निरर्थक ठरले नाहीत. हिंदू कोड बिलाचे चार वेगळे भाग करून हे चारही कायदे वेगवेगळ्या वेळी नेहरूंनी मंजूर करून घेतले.

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्त्री विषयक कायदे**

डॉ. आंबेडकर यांनी स्त्रियांच्या अधिकारसाठी, संरक्षणासाठी, त्यांच्या विकासासाठी अनेक कायदे मंजूर केले, स्त्रियांना हक्क, दर्जा, प्रतिष्ठा मिळावी यासाठी त्यांनी मांडलेल्या हिंदू कोड बिलाचा ठराव नामंजूर करण्यात आला. कालांतराने हिंदु कोड बिलाचे चार वेगवेगळे भाग करून ते चारही कायदे सरकारने मजूर करून घेतले. या कायद्यामुळे स्त्रियांना अनेक अधिकार प्राप्त झाले.

**१) हिंदू विवाह कायदा- १९५५**

हिंदू विवाह कायदा १९५५ हा हिंदू कोड बिलमधील चार कायद्यापैकी एक आहे. या कायद्याने हिंदू विवाह कायदा संहिताबद्ध सुधारित केला. यात हिंदू विवाहाच्या नोंदणीची तरतूद करण्यात आली आणि पुरुषांसाठी वयाची किमान वय २१ आणि महिलांसाठी १८ ठेवले गेले .या कायद्याने घटस्फोटासाठी अनेक नवीन कारणे देखील सादर केली. त्यात क्रूरता, त्याग, व्यभिचार यांचा समावेश होतो. हिंदू विवाह कायदा १९५५ ने हिंदू समाज महिलांच्या कायदेशीर स्थितीत महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले. या कायद्यात लैंगिक समानता आणि सामाजिक न्याय आणणे हा या कायद्याचा उद्देश होता. या कायद्यामुळे महिलांच्या हक्कांना चालना देण्यासाठी आणि त्यांना कायदेशीर व्यवस्थेत सक्षम बनवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

**२) हिंदू दत्तक आणि देखभाल कायदा - १९५६**

या कायद्यात दत्तकाना कायदेशीर मान्यता देण्यात आली आणि दत्तक घेण्याच्या कार्यपद्धती परिभाषित केल्या. या कायद्याने पत्नी, मुले आणि पालक यांचा पालन पोषणाची तरतूद केली आणि पती किंवा मुलाने त्यांच्या पालनपोषणाची तरतूद करणे कायदेशीर बंधनकारक केले. हा कायदा जो हिंदू कुटुंबातील मुलांना दत्तक घेणे आणि त्यांची देखभाल करणे संबंधित बाबींवर नियंत्रण ठेवतो. या कायद्याने महिलांच्या अधिकारांमध्ये महत्त्वपूर्ण बदल करून आणले. त्यात हिंदू विधवेला पती नसतानाही मूल दत्तक घेण्याचा अधिकार मान्य करण्यात आला. या कायद्यात महिलांसह आश्रित नातेवाईकांच्या देखभालीची तरतूद करण्यात आली असून कोणत्याही प्रसंगात त्यांना आधार दिल्याशिवाय सोडले जाणार नाही, याची खात्री केली आहे.

**३) हिंदू उत्तराधिकारी कायदा १९५६**

या कायद्याने पुरुष आणि महिला वारसांना समान हक्क प्रदान केले आणि सह कौटुंबिक आणि संयुक्त कुटुंब संपत्तीची व्यवस्था रद्द केली. या कायद्यानुसार मुलीदेखील त्यांच्या वडिलांच्या मालमत्तेत सहभाज्य बनल्या आहेत. आणि त्यांना त्यांच्या वडिलांच्या मालमत्तेवर मुलाप्रमाणे समान अधिकार आहे.

**४) हिंदू अल्पसंख्यांक आणि पालकत्व कायदा १९५६**

या कायद्यात अल्पवयीन मुलींचे नैसर्गिक पालक म्हणून आईसह अल्पवयीन मुलांसाठी पालकांची नियुक्ती करण्याची तरतूद केली आहे. पती किंवा मुलाने त्यांच्या पालन पोषणाची तरतूद करणे कायदेशीर बंधनकारक केले आहे. २००६ मध्ये या कायद्यातील सुधारणा हे भारतातील लैंगिक समानता आणि महिलांच्या हक्कांच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल होते. या दुरुस्तीने हिंदू आईला तिच्या मुलाच्या मालमत्तेत कायदेशीर पालक म्हणून काम करण्याची परवानगी दिली. ज्यामुळे तिला तिच्या मुलाच्या आर्थिक बाबीवर अधिक नियंत्रण मिळून शकेल.

या प्रमाणे महिलेसाठी आणखी काही कायदे केले ते पुढीलप्रमाणे -

१) सतीप्रतिबंधक कायदा
२) हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा
३) विवाह नारी संपत्ती संरक्षक कायदा
४) बालिका विवाह प्रतिबंधक कायदा
५) प्रसूती सुविधा कायदा
६) मातृत्व लाभ कायदा

७) राष्ट्रीय महिला आयोग कायदा

८) घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा

असे कायदे करण्यात आले. या कायद्यांच्या अंमलबजावणीमुळे भारतीय स्त्रियांची प्रगती साधली आहे.

- **निष्कर्ष**

भारतीय इतिहासावर नजर टाकली तर असे दिसून येते की, हजारो वर्षापासून समाज व्यवस्थेत स्त्री ही नेहमी दुर्लक्षित राहिली. मग ती स्त्री कोणत्याही जाती-धर्माची असो वा गरीब-श्रीमंत असो. प्रत्येक स्त्री ही हक्कापासून, अधिकारांपासून वंचित होती. अशावेळी अनेक वर्षे चालत आलेल्या समाज व्यवस्थेला डॉ. आंबेडकर यांनी विरोध केला. डॉ. आंबेडकर यांनी स्त्री शिक्षणाचे, स्त्री सामाजिकीकरणाचे, स्त्री सक्षमीकरणाचे, स्त्रियांना समान अधिकार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांनी स्त्री शिक्षणावर अधिक भर दिला. स्त्रियांना पुरुषांइतकेच अधिकार मिळावेत, त्यांना स्वातंत्र्य मिळावे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा यासाठी त्यांनी अनेक लढे दिले. हिंदू कोड बिलाद्वारे स्त्रियांना अनेक अधिकार दिले. लेखनातून भाषणातून महिलविषयक जनजागृती केली. डॉ. आंबेडकरांच्या प्रयत्नामुळेच आजची स्त्री ही शिक्षित आहे, सक्षम आहे. तिला सर्व प्रकारचे अधिकार प्राप्त आहेत. तिला समाजात मानसन्मान आहे. डॉ. आंबेडकरांच्या प्रयत्नामुळे स्त्रीयांची उन्नती झाली आहे. डॉ. आंबेडकरांचे कार्य स्त्री वर्गाच्या उद्धारासाठी परिवर्तनशील व प्रबोधनात्मक आहे.

- ***संदर्भ ग्रंथ***

1. *डॉ. कांबळे अमर, शोभा चाळके म्हमाने ,समग्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कोल्हापूर, डिसेंबर २०१६*
2. *डॉ. बर्डे, संजय, भारतरत्न डॉ. बाबासाहेबांचे शैक्षणिक चिंतन, संदेश प्रकाशन, दिल्ली, २०१६*
3. *डॉ. मनोहर यशवंत, नवसंस्कृतीचे जनक : डॉ बाबासाहेब आंबेडकर, नॉलेज मिशन प्रकाशन, औरंगाबाद*

*नियतकालिक*

1. *डॉ. इंगळे नरेश, महिला सक्षमीकरनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान ,श्री संत शंकर महाराज कला व वाणिज्य महाविद्यालय पिंपळखुटा, तालुका धामणगाव ,एप्रिल २०२१*
2. *डॉ. पाटील संजय जिभाऊ, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रियांच्या शिक्षणाविषयीचे योगदान, क्रांतिवीर नवल भाऊ कला महाविद्यालय, नवलनगर जिल्हा धुळे*
3. *डॉ. माहुरे डी वाय एस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्त्री शिक्षण ,कला वाणिज्य महाविद्यालय घाटंजी जून २०१८*
4. *सावरकर तुषार, रुपगंध: महिला सक्षमीकरण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, प्रभात वृत्तसेवा, एप्रिल २०२१*
5. *डॉ. आवड विश्वनाथ महादेव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल, Esakal* www.esakal.com
6. *हिंदू कोड बिल एक महिला हक्क आंदोलन, Legal Service India E -Journal*
7. *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्रियांबाबतचा लढा, विकिपीडिया,mr-m.wikipedia.org*